पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १७

**सभावृत्तांत**

दिनांक - **१९/१२/२०१७** वेळ – दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **१९/१२/२०१७** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सुनिता हेमंत तापकीर - सभापती**
२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे - उपसभापती
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
५. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
६. मा.लोखंडे चंदा राजू
७. मा.सुलक्षणा राजू धर
८. मा.कदम निकिता अर्जुन
९. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.आष्टीकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.लांडे – मुख्य लेखापाल, मा.आवारी – प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) महिलांना स्वयंरोजगारासाठी शिवणयंत्र घेणेसाठी अर्थसहाय्य, मागासवर्गीय मुला/मुलींना व सर्वसाधारण मुलींना सायकल घेणेसाठी अर्थसहाय्य या योजनांच्या अटी व शर्तीमध्ये बदल करणेबाबत – मा.योगिता नागरगोजे, मा.सोनाली गव्हाणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) चारचाकी हलके वाहन **(LMV)** चालविण्याचे मोटार ड्रायव्हिंग प्रशिक्षण अटी व शर्तीमध्ये बदल करणेबाबत - मा.सोनाली गव्हाणे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमांतर्गत नविन कोर्स सुरु करणेबाबत – मा.वैशाली घोडेकर, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) शिक्षण मंडळाकडील मंजूर निविदा दराने अंगणवाडीमधील मुला/मुलींना गणवेश, खेळ गणवेश, स्वेटर, स्वच्छता कीट व खेळणी वाटप करणेबाबत – मा.सागर आंगोळकर, मा.सुलक्षण धर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) एम.एस.सी.आय.टी. केंद्र सुरु करणेबाबत – मा.वैशाली घोडेकर, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **०५/१२/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक १६ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - २६ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १९/१२/२०१७

सुचक : मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.सोनाली गव्हाणे

संदर्भ : मा.योगिता नागरगोजे, मा.सोनाली गव्हाणे यांचा प्रस्ताव –

महिलांना स्वयंरोजगारासाठी शिवणयंत्र घेणेसाठी अर्थसहाय्य, मागासवर्गीय मुला/मुलींना व सर्वसाधारण मुलींना सायकल घेणेसाठी अर्थसहाय्य या योजनांच्या अटी व शर्तीमध्ये खालीलप्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**२) महिलांना स्वयंरोजगारासाठी शिवणयंत्र घेणेसाठी अर्थसहाय्य अटी व शर्ती मध्ये बदल –**

२) शिवणयंत्र खरेदी केल्याची GST नंबर असलेली पक्की पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक –

**खालीलप्रमाणे ठरावात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.**

२) शिवणयंत्र खरेदी केल्याची GST नंबर असलेली पक्की पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक नाही परंतु सदर अर्ज पात्र होऊन मनपाने कळविल्यानंतर GST नंबर असलेली पक्की पावती जोडणे आवश्यक आहे.

**५) मागासवर्गीय मुला/मुलींना मोफत सायकल घेणेसाठी अर्थसहाय्य अटी व शर्तीमध्ये बदल ( इ.८ वी ते १२ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी) –**

५) सायकल खरेदी केल्याची GST नंबर असलेली पक्की पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक –

**खालीलप्रमाणे ठरावात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.**

२) सायकल खरेदी केल्याची GST नंबर असलेली पक्की पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक नाही परंतु सदर अर्ज पात्र होऊन मनपाने कळविल्यानंतर GST नंबर असलेली पक्की पावती जोडणे आवश्यक आहे.

**६) सर्वसाधारण मुलींना मोफत सायकल घेणेसाठी अर्थसहाय्य अटी व शर्तीमध्ये बदल ( इ.८ वी ते १२ वी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थिनींसाठी ) –**

६) सायकल खरेदी केल्याची GST नंबर असलेली पक्की पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक –

**खालीलप्रमाणे ठरावात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.**

सायकल खरेदी केल्याची GST नंबर असलेली पक्की पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक नाही परंतु सदर अर्ज पात्र होऊन मनपाने कळविल्यानंतर GST नंबर असलेली पक्की पावती जोडणे आवश्यक आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २७ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १९/१२/२०१७

सुचक : मा. सोनाली गव्हाणे अनुमोदक : मा. योगिता नागरगोजे

संदर्भ : मा.सोनाली गव्हाणे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव –

चारचाकी हलके वाहन (LMV) चालविण्याचे मोटार ड्रायव्हिंग प्रशिक्षण या योजनांच्या अटी व शर्तीमध्ये खालीलप्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

**६) प्रशिक्षण सहभाग शुल्क खालीलप्रमाणे राहिल –**

अ) रक्कम रुपये - १,००,०००/- पर्यंत उत्पन्न असणा-या महिलांना सहभाग शुल्क नाही.
ठरावात बदल नाही.

ब) रक्कम रुपये १,००,०००/- पेक्षा जास्त र.रु.२,००,०००/- उत्पन्न असणा-या महिलांना सहभाग शुल्क २५% रक्कम सहभाग शुल्क म्हणून अगाऊ भरणे आवश्यक. सहभाग शुल्क भरलेनंतरच प्रशिक्षण घेण्यास पात्र करणेत येईल.

**खालीलप्रमाणे ठरावात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.**

रक्कम रुपये १,००,०००/- पेक्षा जास्त उत्पन्न असणा-या महिलांना सहभाग शुल्क २५% रक्कम सहभाग शुल्क म्हणून अगाऊ भरणे आवश्यक. सहभाग शुल्क भरलेनंतरच प्रशिक्षण घेण्यास पात्र करणेत येईल.

क) र.रु.२,००,०००/- पर्यंत उत्पन्न असणा-या विधवा महिलांना कोणतेही सहभाग शुल्क भरावे लागणार नाही. विधवा महिलांना पतीच्या मृत्यू दाखल्याची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**खालीलप्रमाणे ठरावात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.**

विधवा महिलांसाठी कोणतेही सहभाग शुल्क भरावे लागणार नाही. विधवा महिलांना पतीच्या मृत्यू दाखल्याची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

७) कौटुंबिक वार्षिक उत्पन्न र.र.२,००,०००/- पर्यंत असणे आवश्यक आहे. पुराव्यार्थ मा.तहसिलदार / तत्सम अधिका-याकडील उत्पन्नाचा दाखला / रेशनकार्डवरील र.रु.२,००,०००/- पर्यंतचे नमुद उत्पन्न प्रत आवश्यक.

**खालीलप्रमाणे ठरावात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.**

पुराव्यार्थ रेशनकार्डवरील र.रु.१,००,०००/- व त्यावरील उत्पन्न ग्राह्य धरले जाईल किंवा मा.तहसिलदार / तत्सम अधिका-याकडील उत्पन्नाचा दाखला.

१०) लग्नानंतर किंवा इतर कारणास्तव नांव बदलाबाबतच्या पुराव्यार्थ लग्नपत्रिका/विवाह नोंदणी दाखला/शासकीय राजपत्र/र.रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर केलेला नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र यापैकी एक कागदपत्र जोडणे आवश्यक.

**खालीलप्रमाणे ठरावात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.**

लग्नानंतर किंवा इतर कारणास्तव नांव बदलाबाबतच्या पुराव्यार्थ लग्नपत्रिका/विवाह नोंदणी दाखला/शासकीय राजपत्र/लग्नानंतरचा पॅनकार्ड यापैकी एक कागदपत्र जोडणे आवश्यक.

अट क्र.४ – वय वर्ष २५ ते ४५ असणे आवश्यक ऐवजी

**खालीलप्रमाणे ठरावात बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.**

वय वर्षे २२ ते ४५ असणे आवश्यक आहे. पुराव्यार्थ जन्मदाखला/शाळा सोडल्याचा दाखला/ एस.एस.सी.प्रमाणपत्र/आधारकार्ड/पॅनकार्ड यापैकी एक कागदपत्र जोडणे आवश्यक. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाची अंमलबजावणी करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २८ विषय क्रमांक - ०३

दिनांक - १९/१२/२०१७

सुचक : मा.वैशाली घोडेकर अनुमोदक : मा.सागर आंगोळकर

संदर्भ : मा.वैशाली घोडेकर, मा.सागर आंगोळकर यांचा प्रस्ताव –

सन २०१८-१९ या वर्षासाठी महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रम या योजनेच्या प्रशिक्षणांतर्गत सन २०१७-१८ मधील एकूण २० विषय व १) फॅशन डिझायनिंग, २) मेणबत्ती व अगरबत्ती तयार करणे, ३) ऑफसेट प्रिंटींग व बुक बायडींग, ४) विविध प्रकारच्या फाईल्स तयार करणे, ५) रुखवत सजावट, ६) नैसर्गिक पानांपासून द्रोण, पत्रावळी तयार करणे, ७) अडव्हान्स पेपर कन्व्हर्जन, ८) हार व तोरण तयार करणे, ९) बेसिक योगा इन्स्ट्रक्टर, १०) लॉन्ड्री सर्व्हिसेस, ११) टायपिस्ट (मराठी), १२) टायपिस्ट (इंग्रजी) असे एकूण ३२ विषयांचे प्रशिक्षण देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - २९ विषय क्रमांक - ०४

दिनांक - १९/१२/२०१७

सुचक : मा. सागर आंगोळकर अनुमोदक : मा.सुलक्षणा धर

संदर्भ : मा.सागर आंगोळकर, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव –

शिक्षण मंडळाकडील मंजूर निविदा दराप्रमाणे अंगणवाडी मधील मुला / मुलींसाठी गणवेश, खेळ गणवेश, स्वेटर, स्वच्छता कीट, व खेळणी वाटप करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३० विषय क्रमांक - ०५

दिनांक - १९/१२/२०१७

सुचक : मा.वैशाली घोडेकर अनुमोदक : मा.सुलक्षणा धर

संदर्भ : मा.वैशाली घोडेकर, मा.सुलक्षणा धर यांचा प्रस्ताव –

महानगरपालिकेच्या नागरवस्ती विभागाकडील महिला व बालकल्याण मागासवर्गीय व अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत पाच ठिकाणी एम.एस.सी.आय.टी. (MSCIT) सेंटर सुरु आहेत. नागरिकांची मागणी व सन्मा.सदस्यांच्या मागणीचा विचार करता प्रत्येक प्रभाग कार्यालया नुसार (MSCIT) ची नविन सेंटर सुरु करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सुनिता हेमंत तापकीर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१३३९/२०१७
दिनांक : २१/१२/२०१७

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.